खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

(सुवर्णमहोत्सवी वर्ष)

प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष : २०२६ -२०२७

साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे जयंती उपक्रम

लोकमत

विविध उपक्रमांतून अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

उपेक्षितांच्या भावना समजून घ्यायच्या असतील तर अण्णा भाऊ साठे यांची 'फकिरा' आवर्जून वाचावी, : ॲड. बुट्टेपाटील

राजगुरुनगर येथे गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पुस्तक भेट देताना अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील व मान्यवर.

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांनी त्यांच्या साहित्यातून दलित, शोषित, कष्टकरी, कामगार यांची व्यथा मांडली आहे. त्यांचे साहित्य जीवनवादी होते. उपेक्षितांच्या भावना समजून घ्यायच्या असतील तर विद्यार्थ्यांनी अण्णा भाऊ साठे यांची "फकिरा" कादंबरी आवर्जून वाचावी, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. वैभवी कोपर्डे उपस्थित होते.

मराठी विभागाच्या माध्यमातून साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण करताना त्यांचा जन्मदिवस लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

गुणवंतांना प्रमाणपत्र

"एकदा काय झालं..." कथालेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक सुप्रिया ठोकळ, द्वितीय दीक्षा जाधव, तर तृतीय विद्या गावडे यांनी मिळविला. निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक ज्ञानेश्वरी मेदगे, द्वितीय क्रमांक प्रतीक्षा कुदेकर, तृतीय क्रमांक अक्षदा अरगडे यांनी पटकावला. या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पुस्तक भेट देऊन प्रोत्साहित करण्यात आले.

अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त वडापुरी परिसरात प्रतिमेचे पूजन

लोकमत न्यूज नेटवर्क

बावडा : वडापुरी (ता. इंदापूर) येथे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी शिवाजी तरंगे, दादासो जगताप, नानासो पासगे, भारत चंदनशिवे, तानाजी पिंगळे, धनंजय चंदनशिवे, मारुती पासगे, गौरख चंदनशिवे, सत्यवान पासगे, मंगेश माने, माउली गायकवाड तसेच आयोजक सूरज पासगे, अमोल पासगे, सत्यवान पासगे, चांगदेव पासगे, दत्तात्रेय पासगे, सागर पासगे, दीपक पासगे, आप्पाजी पासगे, बंटी गायकवाड, आदेश गायकवाड, आनंद पासगे, सोमनाथ पासगे, भैरव पासगे, राजू पासगे, लखन पासगे, परशुराम पासगे, सतीश गायकवाड, चंदू मिसाळ व इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पंधारवाडीची जगताप व राजश्री अमोल पासगे या मुलींनी अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनचरित्रावर आपले मनोगत व्यक्त केले.

वडापुरीत साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे योगदान प्रेरणादायी : मांढरे

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या लिखाणातून मिळालेले योगदान आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी व्हावे या उद्देशाने बारामती नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष विद्यमान नगरसेवक बिरजू मांढरे व नगरसेविका प्रतिभा विजय खरात यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू केलेला लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती महोत्सव उत्साहात झाला.

यावेळी बारामती नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सचिन सातव,

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा सत्कार आदी कार्यक्रम पार पडले.

सादर करणारे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे" या विषयावर प्रा. मनोज काबळे यांचे व्याख्यान झाले.

नगराध्यक्ष सचिन सातव, काळूराम चौधरी, जय पाटील, शुभम अहिवळे, आलिंदर सोनवणे आदींनी मनोगत व्यक्त केले. स्व. अजितदादा पवार यांच्या निधनाचे अद्यापही दुःख असल्याने जयंती मोठ्या स्वरूपात न करता व्याख्यान, वृक्षारोपण व विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करून

Hello Pune Gramin
Page No. 7 Aug 02, 2026
Powered by: erelego.com

पुढारी

'अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य जीवनवादी'

राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा

साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांनी त्यांच्या साहित्यातून दलित, शोषित, कष्टकरी, कामगारांची व्यथा मांडली. त्यांचे साहित्य जीवनवादी होते, असे मत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी व्यक्त केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. वैभवी कोपर्डे उपस्थित होते.

मराठी विभागाच्या माध्यमातून साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण करताना त्यांचा जन्मदिवस लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. या निमित्ताने 'एकदा काय झालं...' या विषयावर कथालेखन स्पर्धा, 'माझे सामाजिक योगदान' या विषयावर निबंध स्पर्धा, अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे अभिवाचन इत्यादी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात कला व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कथालेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक सुप्रिया ठोकळ, द्वितीय क्रमांक दिक्षा जाधव तर तृतीय क्रमांक विद्या गावडे यांनी पटकावला. निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक ज्ञानेश्वरी मेदगे, द्वितीय प्रतीक्षा कुडेकर व अक्षदा अरगडे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पुस्तक भेट देऊन प्रोत्साहित करण्यात आले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

कथालेखन स्पर्धेतील सुप्रिया ठोकळ यांना सन्मानित करताना ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील.

My Pune Gramin Edition
Aug 02, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख